# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.04.2024** **वारःसोमवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग, पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी आज चंद्रपूरमध्ये राज्यातल्या प्रचाराचा नारळ फोडणार
2. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी निवडणूक यंत्रणेकडून विविध उपक्रमांचं आयोजन
3. येत्या लोकसभा निवडणुकांमध्ये राज्यातील 254 मतदान केंद्रांचं नियंत्रण दिव्यांग कर्मचाऱ्यांकडे आणि
4. महाराष्ट्र राज्य खो खो संघटनेची निवडणूक बिनविरोध

**<u>पंतप्रधान विदर्भ दौरा</u>**

पहिल्या टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय हालचालींना वेग आला असून ठीकठिकाणी आता प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज चंद्रपूरमध्ये राज्यातल्या प्रचाराचा नारळ फोडणार आहेत. चंद्रपूर आणि गडचिरोली लोकसभा मतदारसंघातील भाजपा उमेदवारांच्या समर्थनार्थ ते संध्याकाळी प्रचारसभा घेणार आहेत. मोरवा विमानतळ मैदानावर त्यांची जाहीर सभा होणार असून राज्यातील भाजपाचे ज्येष्ठ नेते तसंच महायुतीतील घटक पक्षांचे नेतेही या सभेला उपस्थित राहणार आहेत.

राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार असून गडचिरोलीचे विद्यमान खासदार अशोक नेते गडचिरोली लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढत आहेत. दरम्यान, रामटेक लोकसभा मतदारसंघातून उभे असलेले महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांच्यासाठी देखील पंतप्रधान मोदी येत्या दहा एप्रिलला प्रचारसभा घेणार आहेत. पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर आणि भंडारा-गोंदिया या पाच मतदारसंघात या महिन्याच्या 19 तारखेला मतदान होणार आहे.

**<u>प्रचार जाहीरनामा</u>**

रामटेक तसंच यवतमाळ वाशिम हा लोकसभा मतदारसंघ शिवसेना मोठ्या फरकाने जिंकेल असा विश्वास मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी काल नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

महायुतीचे दक्षिण - मध्य मुंबईचे उमेदवार खासदार राहुल शेवाळे यांनी, विकसित मुंबई ते विकसित भारत अशी घोषणा केली आहे. मुंबईत स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक इथे आयोजित केलेल्या महायुतीच्या निर्धार मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी शेवाळे यांनी विकसित भारतासाठी विकसित मुंबईचं योगदान विषद केले.

'हर घर मोदी परिवार' या जनसंपर्क अभियाना अंतर्गत भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते पुण्यातील अनेक घरांपर्यंत पोहोचत आहेत; पुणे लोकसभेचे भाजपा-महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हेही या अभियानात सहभागी झाले होते. मोहोळ यांनी काल पुण्यातील झैनी मशिदीलाही भेट दिली आणि सर्व मुस्लिम बांधवांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या.

बारामती मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार आणि पुण्यातील महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांची काल पुण्यात प्रचारादरम्यान भेट झाली. यावेळी त्यांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. धंगेकर यांच्या प्रचारार्थ काँग्रेसच्या कोथरूड विधानसभा मतदारसंघातर्फे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचं काल आयोजन करण्यात आलं होतं.

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी उरण विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक काल आयोजित करण्यात आली होती. राज्यातील मंत्री उदय सामंत यांच्यासह महायुतीतील मित्रपक्षांचे नेते यावेळी उपस्थित होते.

दरम्यान बीड लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीनं अशोक हिंगे पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्याशिवाय नागपूरच्या रामटेक लोकसभा मतदार संघात अपक्ष उमेदवार-माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये यांना पाठींबा जाहीर केला असल्याचं पक्षाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

स्वराज्य सेनेनं माढा लोकसभा मतदारसंघासाठी सत्यवान ओंबासे यांची उमेदवारी जाहीर केली असून काल पुण्यात या पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. रोजगार, आरक्षण आणि आरोग्य क्षेत्राचा विकास करण्यावर पक्षाचा भर असेल, असं पक्षाचे अध्यक्ष संजय वाडकर यांनी यावेळी सांगितलं.

**रनफॉरवोट-कोल्हापूर**

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी निवडणूक यंत्रणा राज्यात विविध जनजागृतीपर उपक्रमांचं आयोजन करत आहे. कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीनं काल घेण्यात आलेल्या 'रन फॉर वोट' लोकशाही दौडमध्ये 6 हजार 359 नागरिक सहभागी झाले होते. आंतरराष्ट्रीय वंडर बुक ऑफ रेकॉर्डमधे या लोकशाही दौडची नोंद करण्यात आली.

**सांगली कार्यक्रम**

स्वीप कार्यक्रमांतर्गत सांगलीतील छत्रपती शिवाजी मैदानावर काल जिल्हा प्रशासन अधिकारी आणि पत्रकार यांच्यात क्रिकेटचा सामना रंगला तर मिरजेतील लक्ष्मी मार्केट परिसरात पथनाट्यातून मतदान जागृती करण्यात आली.

**सायकलरॅली-रत्नागिरी**

रत्नागिरी उपविभागीय कार्यालयाने काल मतदान जनजागृतीसाठी शहरात सायकल रॅली आयोजित केली होती. मी मतदान करणार आहे. तुम्हीही करा आणि इतरांनाही त्यासाठी प्रोत्साहित करा, असं आवाहन या वेळी जिल्हाधिकारी देवेंदर सिंह यांनी केलं.

**रांगोळी-नाशिक**

नाशिकमध्ये आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त गोदाघाटावर 5625 चौरस फुटांची धान्याची महारांगोळी साकारण्यात आली; आणि या रांगोळीच्या माध्यमातून मतदान करण्याचं आवाहन करण्यात आलं. राष्ट्रीय विकास मंडळ, गुणगौरव न्यास आणि नाशिक महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला.

**दिव्यांग कर्मचारी**

येत्या लोकसभा निवडणुकांसाठी प्रत्येक मतदारसंघात दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्रे असणार आहेत. राज्यभरात एकंदर 254 मतदान केंद्राचं नियंत्रण दिव्यांग कर्मचारी करणार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे 30 मतदान केंद्रांचे नियंत्रण दिव्यांग कर्मचारी करणार आहेत. या वर्षी मतदार यादीमध्ये एकंदर 6 लाख 4 हजार 145 दिव्यांग मतदार आहेत. त्यापैकी ज्या मतदारांच्या दिव्यांगत्वाचे प्रमाण 40 टक्केपेक्षा जास्त असेल अशा मतदारांपैकी इच्छुक मतदारांना टपाली मतपत्रिकेद्वारे गृह मतदानाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

**निवडणूक आयोग-निरीक्षकनियुक्ती**

भारतीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह सहा राज्यांसाठी दोन श्रेणींमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. राज्यात, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी धर्मेंद्र एस गंगवार यांची नियुक्ती सामान्य विशेष निरीक्षक म्हणून आणि भारतीय पोलीस सेवेतील माजी  अधिकारी एन.के मिश्रा यांची पोलिस विशेष निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

**आरोग्यदिन-नाशिक**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त काल राज्यात विविध ठिकाणी अनेक उपक्रम घेण्यात आले. माझं आरोग्य माझा अधिकार, असं यंदाच्या जागतिक आरोग्य दिनाचं घोषवाक्य होतं. इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या नाशिक जिल्हा शाखेनं आणि नाशिक सायकलिस्टस् फाउंडेशननं काल सायक्लोथॉनचं आयोजन केलं होतं. सायकल चालवा आरोग्य टिकवा, माझे आरोग्य माझा हक्क, पर्यावरण संवर्धन आपली जबाबदारी अशी प्रबोधनात्मक घोषवाक्य देत अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने ही सायकल रॅली मार्गस्थ झाली.

**कुडाळ छापा-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ शहरात व्हिडीओ गेमच्या नावाखाली जुगार चालविणाऱ्या पाच व्हीडीओ गेम पार्लरवर कुडाळ पोलिसांनी शनिवारी छापा टाकून 43 हजाराच्या रोख रक्कमेसह 46 मशीन मिळून 9 लाख 63 हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. तिथल्या 8 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर या पार्लरच्या मालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. अशी माहिती कुडाळ पोलिसांनी दिली.

**नक्षलअटक-गडचिरोली**

विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या दोन नक्षल महिलांसह एका नक्षल समर्थकास गडचिरोली पोलिसांनी अटक केली आहे. या तिघांवर महाराष्ट्र शासनाने साडेपाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु असताना हिंसक कारवाया करण्याची योजना नक्षलवादी आखत आहेत. त्यामुळे पोलिस ठिकठिकाणी नक्षलविरोधी अभियान राबवीत आहेत.

**खोखो-सोलापूर**

महाराष्ट्र राज्य खोखो संघटनेची निवडणूक काल पुण्यातल्या महाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात पार पडली. 2024-2028 या कालावधी करता ही निवडणूक जाहीर झाली होती. या निवडणुकीत सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत असं निवडणूक अधिकारी ॲडवोकेट धीरज कोल्हे यांनी जाहीर केलं. भारतीय खोखो महासंघाचे निरीक्षक म्हणून इंदूरचे नितिन कोठारी यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य खोखो संघटनेच्या अध्यक्षपदी संजीवराजे नाईक-निंबाळकर यांची तर उपाध्यक्षपदी जितेंद्र आव्हाड, अनिकेत तटकरे, महेश गादेकर, अशोक पितळे यांची निवड झाली आहे. पुण्याच्या सचिन गोडबोले यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यावेळी भारतीय खोखो महासंघ महासचिव एम. एस. त्यागी यांची विशेष उपस्थिती होती. खो-खो हा खेळ 49 देशात खेळला जात असून 37 देशांत राष्ट्रीय खो-खो संघटनांची स्थापना झाल्या असल्याची माहिती त्यागी यांनी यावेळी बोलताना दिली. खो-खो विश्वचषक स्पर्धा 2024 च्या अखेर पर्यंत आयोजित करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागात आजपासून पुढील तीन दिवस वीजा, गारा आणि जोराचे वारे यांच्यासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.